# ॥ अध्याय आठवा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ शिष्य म्हणे अहो गुरुराया । वृद्धनृसिंह जगताशया । अवतार घेती भक्तजन-कार्या । धर्मसंस्थापना कारणें ॥ १ ॥ अलवणीबुवा सेवकांसहित । तृप्त जाहले आरोग्यवंत । गर्भांधासी नेत्र त्वरित । दिधले नृसिंहमुनिवरें ॥ २ ॥ वृद्ध शूद्राची स्त्री जगन्नाथमेळीं । नृसिंहकृपें लाधली तात्काळीं । भस्म स्पर्शितां कपाळीं । आली पूर्वजन्मस्मृति तयां ॥ ३ ॥ समस्त जनांसी नृसिंहदर्शन । सहज लाधलें आशीर्वचन । श्रीमन्नृसिंह-चरणचिंतन । करित गेले जन स्वस्थानीं ॥ ४ ॥ पुढें वर्तलें काय वृत्त । श्रवणार्थ चित्त उत्सुक होत । कृपा करूनि गुरुलीलामृत । जगद्धितार्थ सांगा जी ॥ ५ ॥ अखंड गुरुभक्तीचा संचार । अंगीं भरला पूर्णविचार । नृसिंहसरस्वतीचें अपार चरित्र । गुरु वदती शिष्यासी ॥ ६ ॥ नृसिंहगुरुवर्य हरिद्वारीं । असतां वर्तलें नवल भारी । दोन युवमल्ल दृढशरीरी । असती तेथें द्विजवंशीं ॥ ७ ॥ करूनि मल्लबाहुयुद्ध । जिंकिती इतरांसी प्रसिद्ध । शरीरसंपत्तीनें समृद्ध । मल्लयुद्ध-विशारद ॥ ८ ॥ त्यागूनि स्ववर्णाश्रमधर्म । अहंकारें विपरित कर्म । आचरती न जाणूनि वर्म । दयाधर्म नसेचि ॥ ९ ॥ दुष्ट मदांध परपीडक । विनास्वार्थ साधुनिंदक । परस्त्री-परधनापहारक । महाछलक मल्ल ते ॥ १० ॥ कोणासी कांहींच मागती । न दिधल्यासी बळें ताडिती । असेल तेवढें हिसकावून घेती । बंधुद्वय मल्ल ते ॥ ११ ॥ ऐसें चाललें बहुत दिवस । लोकांसी सोसवेना महत्त्रास । जन प्रार्थिती परमेश्वरास । हे राक्षस वधावे ॥ १२ ॥ पुढें प्रारब्धकर्मसंयोग । मल्लांसी रक्तपित्ती सर्वांग । उद्भवलासे दुःसह महारोग । भोगिती भोग अनिवार ॥ १३ ॥ रोगें हातापायांचीं गळालीं

पोटें । तेणें दिसती वाईट थोटे । स्वजनीं त्यागिले रोगी ओखटे । न भरती पोटें तयांचीं ॥ १४ ॥ कोणी न देती अन्नोदक । मग मागती घरोघरीं भीक । न मिळेचि धान्य कण एक । लोकांसी हांका मारिती ॥ १५ ॥ गर्वें करावें कर्म हांसत। तेंचि परिणामीं भोगावें रडत । 'द्यावें तैसें घ्यावें' हा सिद्धान्त । लोकानुभविक सत्य असे ॥ १६ ॥ विनापराध परांसी गांजणें । अनुकूलकालीं उन्मत्तपणें । परिणामीं महत्कष्ट भोगणें । सुटका न होणें त्याविना ॥ १७ ॥ अनुकूलकालीं सकलसिद्ध । प्रतिकूल समयीं तेंचि विरुद्ध । ऐसें जाणती बहुविध । जन त्रिविध उघड हें ॥ १८ ॥ म्हणूनि अनुकूलकालीं विहित । सद्धर्मकर्म शास्त्रसंमत । निरंतर तें सुशिक्षित । जनांनीं भावें आचरावें ॥ १९ ॥ जैशी आदित्याची छाया । चढते उतरते जाते लया । धन संपत्ति प्रपंचमाया । स्थिर न राहे सहसाही ॥ २० ॥ उदयकालीं सविता रक्त । अस्तमानीं तैसाचि शोभत । संपत्ति-विपत्तिकालांत । एकरूप महंत ते ॥ २१ ॥ अर्थाचिया संपादनीं । क्लेश तैसाचि परिपालनीं । अर्थाची झालिया हानि । दुःख होतसे व्ययकालीं ॥ २२ ॥ अर्जितां पालितां दुःख । नाश होतां खर्चितांही असुख । ऐशा क्लेशकारी अर्थासि देख । धिक्कार असो सर्वदा ॥ २३ ॥ ऐसें धन जें क्लेशकारी । तयाचा लोभ मनुष्यास भारी । या कलियुगीं अनेकप्रकारीं । जाणत असतां होतसे ॥ २४ ॥ धनलोभें तुटती पुत्र । धनलोभें सोडिती कलत्र । धनाचे लोभें इहपरत्र । साध्य न होती निश्चयें ॥ २५ ॥ धनार्थ वधिती मायबापा । धनार्थ प्रवर्तती महत्पापा । वर्णाश्रम-कुलधर्मप्रतापा । धिक्कारिती धनलोभी ॥ २६ ॥ धनलोभी करंटे कृपण । कवडी वेंचितां तळमळी प्राण । धनलोभ्याचें सर्व भाषण । अप्रमाण सर्वदा ॥ २७ ॥ कृपण धनलोभेंकरून । न वांछी कदा भार्यागमन । पुत्र झालिया वित्तहरण । करील माझें सर्वथा ॥ २८ ॥ कृपणपणाची झाली सीमा । धनलोभ्यासी कैंचा काका मामा । धनार्थी नोळखिती । रिकामा । आप्तपणा कदापि ॥ २९ ॥ धनलोभी कृपण प्रचुर । भाषण वरिवरी करिती मधुर । पैठणी आग्रहसह आदर ।

वारंवार करिती ते ॥ ३० ॥ धनलोभी अतिकृपण । देती घेती धनार्थ प्राण । धन शरीरदुःखासी कारण । घातक जाण सर्वस्वीं ॥ ३१ ॥ ऐसे ते विवेकहीन जेठी । निमग्न झाले दुष्टसंकटीं । त्या कालीं स्मरती जगजेठी । श्रीवैकुंठाधिपतीस ॥ ३२ ॥ धांव धांव रे भगवंता । आम्हां दुष्टमदोन्मत्तां । सांभाळावें रोगपीडितां । भक्तवत्सला जगदीशा ॥ ३३ ॥ आम्हीं केलें महापातक । दुर्जन खल परघातक । विषयमदांध भ्रष्ट दांभिक । मोठे छलक अविवेकी ॥ ३४ ॥ अभिमानी शरीर सबळ । देव-द्विज-साधूंचा केला छळ । ताडिले दास दुर्बळ । आम्ही खळ माजलों ॥ ३५ ॥ नाहीं जाणिले धर्माधर्म । धिक्कारिलें वैदिककर्म । धनलोभार्थ काढिलें चर्म । दीनसात्त्विकशरीराचें ॥ ३६ ॥ आमुचें असतां ब्राह्मणकुळ । उन्मत्तपणें धनार्थ केवळ । केलें विपरीतकर्मचांडाळ । कापिले गळे दुर्बळांचे ॥ ३७ ॥ महारोगें पीडिलों भारी । पंचमहापातकी दुराचारी । तुज ईश्वराविना भूवरी । कोण करी पालन ॥ ३८ ॥ उच्चस्वरें मारिती हांका । धांवा चंडीविनायका । राम कृष्ण हरि जगत्पालका । सदाशिवा धांव रे ॥ ३९ ॥ धांव पाव भवानीशंकरा । पुरुषोत्तमा करुणाकरा । शरणागतासी आधारीं । महेश्वरा रक्षावें ॥ ४० ॥ श्रीमद्गुरुदेवदत्त दिगंबरा । अखिलब्रह्मांडाधीश्वरा । योगीराजा दयासागरा । कृपा करा आम्हांवरी ॥ ४१ ॥ आतां सोसवेना व्यथा । तुजविना कोण संरक्षी अनाथा । कुलस्वामी सद्गुरुनाथा । फोडूं माथा काय हो ॥ ४२ ॥ हस्तपादांच्या गळाल्या अंगुली । प्रारब्ध-कर्में दुर्दशा व्यापिली । तुजवीण कोणी नसे माउली । करी साउली कृपेची ॥ ४३ ॥ अहो हरिहरविधि भगवंत । आमचा पाहूं नका अंत । प्रणतभक्तवत्सल दयावंत । ब्रीद अनंत वर्णिती ॥ ४४ ॥ अतिसंकटीं प्रऱ्हादासी । त्वांचि रक्षिलें गजेंद्रासी । वस्त्रें फेडितां द्रौपदीसी । पावलासी लगबगें ॥ ४५ ॥ धांव पांव दयाळा झडकरी । भस्मोद्धूलन शिव त्रिशूलधारी । दीनअनाथांचा तूं कैवारी । तारीं त्रिपुरारी स्मरांतका ॥ ४६ ॥ धांव धांव हे कर्पूरगौर । रोगें पीडिले

द्वादशवत्सर। भक्ताभिमानी भुजगेंद्रहार। धांव सत्वरें शंकरा ॥ ४७ ॥ इकडे हरिद्वारीं विप्रसदनीं। भोजनासी बैसले नृसिंहमुनि। दीनदुःखार्तवचनें मनीं। अंतर्साक्षित्वें जाणिलीं ॥ ४८ ॥ मग तत्काल दीनदयाळ। कळवळोनि उठले उतावीळ। टाकूनि अन्नपूरितपात्रजळ। मनोवेगें पातले ॥ ४९ ॥ ब्राह्मणभोजनीं समुदाय। म्हणती न कळे झालें काय। अकस्मात् श्रीगुरुदत्तात्रेय। कोठें गेले कैसें हे ॥ ५० ॥ भोजन करूनि त्वरें ब्राह्मण। नृसिंहमुनीश्वर जगत्प्राण। चोहोंकडे शोधिती जाण। ब्रह्मांडत्राणालागीं ते ॥ ५१ ॥ देहीं असतां जरी न सांपडे। बाह्य कैंचा तरी दृष्टीस पडे। श्रमें कष्टती जन बापुडे। देवाधिदेवाकारणें ॥ ५२ ॥ ब्रह्मविद्याभ्यासें बरवें। निजहृदयस्थासी ओळखावें। मग अंतर्बाह्य अवलोकावें। सर्वत्र समान ब्रह्मात्मतत्त्व ॥ ५३ ॥ जप तप नियम अनुष्ठान। करितां गुंतले संशयापन्न। ईश्वरप्राप्ति आत्मज्ञानावांचून। न होय सर्वथा श्रुति वदे ॥ ५४ ॥ घडलें जरी गंगा-सागरस्नान। व्रतपरिपालन अथवा दान। ज्ञानविहीनासी सर्वमतेंकरून। अनेक जन्मीं मुक्ति नव्हे ॥ ५५ ॥ झालिया परमेश्वर-गुरुकृपा। मोक्षमार्ग होतसे सोपा। अविद्यातमसंसारसंतापा-। पासून होती निर्मुक्त ॥ ५६ ॥ परी त्यागूनि विषयासक्ति। ईश्वरगुरुचरणीं अनन्यभक्ति। अखंडित पाहिजे ज्ञानशक्ति। पूर्णविरक्तिसहित ते ॥ ५७ ॥ असो ते शुचिर्भूत विप्र। मुनिसंनिध पातले क्षिप्र। भावें वंदिले नृसिंहवप्र। पुढें काय वर्तलें ॥ ५८ ॥ पाहूनि भयंकर महारोग्यांसी। नृसिंहमुनिवरें कृपाकटाक्षेंसीं। अंघ्रिकमलें द्विजशरीरांसी। स्पर्श केला त्या कालीं ॥ ५९ ॥ श्रीमद्गुरु नृसिंहयोगाधीश। पूर्णब्रह्मव्यापकअविनाश। त्या महत्पुरुषाचा पादस्पर्श। द्विजशरीरांस जाहला ॥ ६० ॥ अनेक जन्मीं तप अत्युग्र। अष्टांगयोगें चित्तैकाग्र। भगवत्प्राप्त्यर्थ करिती समग्र। परी जो दुर्लभ असेचि ॥ ६१ ॥ नानाव्रतांचें आचरण। कृच्छ्रचांद्रायणादि उपोषण। भगवत्कीर्तन नामस्मरण। करिती जागरण श्रद्धेनें ॥ ६२ ॥ तथापि भगवच्चरण निर्मल। विध्वंसक-भवसंसारजाल। सुदुर्लभ दर्शन भाग्यशील। कश्चित

पुरुषासी होतसे ।। ६३ ।। ऐसे खल अधर्मी जेठी । परंतु पूर्वसुकृत होतें गांठीं । म्हणूनि नृसिंहयोगीश्वरभेटी । कृपादृष्टि जाहली ।। ६४ ।। उत्तमक्षेत्र हरिद्वारीं । श्रीगंगेच्या कांठीं घाटावरी । मल्ल दोघे पडलेले दुःखसागरीं । रोगें व्याकुल झालेले ।। ६५ ।। साधु ब्रह्मचारी संन्यासी । गृहस्थ वैदिक द्विजवर्य तापसी । घाटावरी संध्यादि-वंदनासी । बैसले सुखें इतर जन ।। ६६ ।। वाळवंटामधीं कित्येक । गोष्टी सांगती मनोरंजक । सुंदर मनोहर मंदिरें अनेक । शोभती लोक गंगातीरीं ।। ६७ ।। गंगोदकाचें पात्र विशाल । पलीकडे पर्वत जंगल । बदरीकेदार मार्ग धवल । शोभे हिमाचलसंबंध ।। ६८ ।। श्रीगंगामूर्ति गंगाद्वारस्थान । पहातांचि वाटे समाधान । पवित्र होय सहज मन । क्षेत्रमहिमा अपार ।। ६९ ।। शुद्धोदकें वाहतसे गंगा । अत्यंत रमणीय शोभे तुंगा । दर्शनें स्नानें पानें निजरंगा । मेळवी अभंगा स्मरणें ती ।। ७० ।। आधींच पवित्र गंगातीर । त्यांत विराजे श्रीहरिद्वार । निश्चयें प्राप्त होय परमेश्वर । जगदाधार अवतारी ।। ७१ ।। ते नृसिंहनारायण । पाप संकटादि विदारण । दीनबंधु न लागतां एकक्षण । करिती संरक्षण सर्वांचें ।। ७२ ।। तेथें दिवसां चतुर्थयामीं । चमत्कार दाविती सर्वांतर्यामी । श्रीमदवधूत नृसिंहस्वामी । लीला अद्भुत जयांची ।। ७३ ।। महारोग्यांचे देहास त्या स्थलीं । पादस्पर्श होतांचि तत्कालीं । सुवर्णशुद्ध दिव्यकांति झाली । निमिषार्धांत श्रोते हो ।। ७४ ।। खडबडून दोघे मल्ल उठले । समर्थांसी लोटांगण घातलें । श्रीगुरुचरणीं मस्तक ठेविलें । प्रेम दाटलें अनिवार ।। ७५ ।। देहास न्याहाळून ते पाहती । आरोग्य तेजस्वी सर्वांगकांति । मग आनंद मावेना चित्तीं । नाचती उडती सप्रेमें ।। ७६ ।। समस्तांसी वाटलें कुतूहल । अमानुषिक कर्तृत्व विशाल । म्हणती ईश्वरेच्छें हलाहल । अमृत होय सर्वथा ।। ७७ ।। द्वादशवर्षांचे रोगपीडित । करीत होते प्राणघात । सर्वांग आरोग्य निमिषांत । केलें पुनीत आपण ।। ७८ ।। प्रत्यक्ष परमेश्वर आपण । अनादि अखंड नारायण । करावया जगदुद्धरण । होतां अवतीर्ण दयानिधि ।। ७९ ।। मायाअज्ञानें वेष्टिलों । जन्मोजन्मीं प्रपंचीं कष्टलों । आम्ही अभिमानी उन्मत्त

भ्रष्टलों । देखतां संतुष्टलों मुनीश्वरा ॥ ८० ॥ त्यांत एक विप्र कुटिल । समर्थांसी पुसे गर्वशील । आपण कोण सांगा कोठील । वर्णाश्रमही कथावा ॥ ८१ ॥ नृसिंह वदती कुटिलासी । आधीं सांगूं तुझ्या वृत्तासी । मग कळेल अन्य प्रश्नासी । देऊं उत्तर सावकाश ॥ ८२ ॥ तूं पूर्वीचा हिंसक व्याध । पुष्कळ केले जीववध । मद्यपी अभक्ष्यभक्षक मदांध । हस्तनापुरीं होतासी ॥ ८३ ॥ अपहारिलें परदारधन । तुज घडलें मातृगमन । तैसेंचि राजकन्येचें प्राणहनन । केलेंसि त्वां पापिष्ठें ॥ ८४ ॥ न्यायी सत्यविचारी चतुर । यवनराजे स्वधर्म तत्पर । त्यांनीं तुजला देशपार । केलें जर्जर दुष्टा रे ॥ ८५ ॥ दूर परदेशीं त्वां जाऊन । तेथेंही निंद्यकर्म गहन । केलेंसि तेणें नासिकछेदन । नेत्र राजदूतें फोडिलें ॥ ८६ ॥ मग राहिलास चर्मकाचे घरीं । तुज पोशिती सद्विचारी । तेथेंही निंद्यकर्म भारी । त्वां केलेंसि निर्लज्जा ॥ ८७ ॥ तेथें तुज पशूंनीं भक्षिलें । त्यांचेहि उदरीं रोग उद्‌ले । तिर्यग्योनींत जन्म झाले । तुझे दोन हिंसका ॥ ८८ ॥ आधींच मनीं पुष्कळ हौस । त्यांत पातला फाल्गुनमास । पशु मारूनि व्याघ्रें उपवास । पारणें सोडिलें तद्वत् ॥ ८९ ॥ होता पूर्वजन्मार्जित । सुकृतसंस्कार किंचित । तेणें आतां द्विज-कुलांत । पावलासि जन्म तूं ॥ ९० ॥ पूर्वस्वभावें विनापराध । काल रात्रीं केलासि गोवध । अतिपातकी दुर्बुद्ध । मुखदुर्गंधि विचारिसी ॥ ९१ ॥ हें ऐकूनि कुटिल भ्याला । थरथरां कापूं लागला । म्हणे अंतर्साक्षी सत्य वदलां । प्रत्यक्ष ईश्वर आपण ॥ ९२ ॥ मजसारिखा महापातकी । खचित नसेल या त्रयलोकीं । आपण साक्षात् भेटले पिनाकी । आतां सद्गुरु तारावें ॥ ९३ ॥ मी अनिवार दुःख भोगिलें । प्रायश्चित्त पुष्कळ आचरिलें । परंतु बुद्धीस स्थिरत्व न आलें । अद्यापवरी प्रभुराया ॥ ९४ ॥ मग समर्थ आज्ञापिती जनांला । मृतगौस्थानासी त्वरें चला । तात्काल त्या द्विजसद्‌नाला । गुरुसह सर्व पातले ॥ ९५ ॥ कुटिल द्विजाच्या गृहामागें । नृसिंह मुनीश्वर जाऊनि अंगें । मृतधेनूचें शव दाविती वेगें । समस्तांकारणें तेधवां ॥ ९६ ॥ सगळे करिती हाहाःकार । म्हणती गौवधाचे दोष अपार । द्विज नव्हे हा अंत्यज निष्ठुर । चांडाल

क्रूरहृदयाचा ॥ ९७ ॥ परम सात्त्विक पूज्य धेनु साचार । तिजवरी दुर्जनें शस्त्रप्रहार । करूनि जोडिलें पाप अघोर । धर्मशास्त्रातें लंघुनी ॥ ९८ ॥ विप्रवंशास लाविला कलंक । मातंगहृदयी निर्दय कंटक । वेदशास्त्रविहित धर्मोच्छेदक । नीच हिंसक अविचारी ॥ ९९ ॥ देखूनि गौमातेचें मृतकलेवर । शोकाकुल झाले नारीनर । मुखें वदती शिवहरहर । कलियुग घोर मातलें ॥ १०० ॥ ब्राह्मण भ्रष्ट कुमार्गरत । मद्यमांसनिंद्यकर्मनिरत । अभक्ष्यभक्षक स्वक्रियातीत । झाले पतित उदरार्थीं ॥ १ ॥ कृत-त्रेता-द्वापारयुगीं । सद्धर्मकर्मज्ञाननिष्ठयोगी । वेदशास्त्रसंपन्न वीतरागी । ब्राह्मण बहुत जाहले ॥ २ ॥ महर्षि सुकवि उग्रतपी । सामर्थ्यवंत शापादपि शरादपि । वेदवेदांगपारग पुण्यप्रतापी । झाले अद्यापि विप्रवर्य ॥ ३ ॥ ब्रह्मविद्ब्रह्मरूप ब्राह्मण । अनादि वेदोक्तधर्मपरायण । मंत्रसामर्थ्यें अखिल देवगण । उभे ठाकती विप्रांपुढें ॥ ४ ॥ ज्यांना प्रत्यक्ष परमेश्वर । साह्य सुप्रसन्न निरंतर । अखंडानुभवी ब्रह्मसाक्षात्कार । शौर्योदार तेजस्वी ॥ ५ ॥ सुरवर दानव सकळिक । श्रीमंत न्यायी प्रजापालक । ब्राह्मणसेवनीं भूपादिक । त्रिकालीं तत्पर प्रेमभावें ॥ ६ ॥ अनिल-जल-पर्ण-फलाशन । करिती संतत ईश्वरोपासन । ऋषि मुनि योगी ब्राह्मणजन । पूजनीय सदोदित ॥ ७ ॥ दया क्षमा शांति अविरोधी । परोपकारी वृत्तिनिरोधी । निष्काम निःस्पृहजन प्रबोधी । झाले कोट्यावधि विप्र ॥ ८ ॥ वेदांचे प्रमुख अधिकारी । शुद्ध गायत्रीचे संस्कारी । ब्राह्मण्य पवित्र सदाचारी । ब्रह्मविद्या-विनयसंपन्न ते ॥ ९ ॥ ऐसे वेदवेदांगार्थसंपन्न । त्रैलोक्यपूजित ब्राह्मणजन । तद्वंशज कलियुगीं स्वधर्मक्रियाहीन । असमर्थ जाहले ॥ ११० ॥ जे सत्त्वगुणविशिष्ट अक्रोध । ते अनुचित कर्म करिती गोवध । याप्रकारें व्हावया उद्बोध । बोलती सावध धर्मखेदें ॥ ११ ॥ हें परिसून कुटिलद्विज । विस्मित जाहला निर्लज्ज । म्हणे जगज्जनका अधोक्षज । उद्धरावें पतितासी ॥ १२ ॥ पतित-पावन कल्मषहरणा । वटपत्रशयनी नारायणा । सूत्रात्मा संपूर्ण विद्यानिपुणा । जगत्कारणा सुराध्यक्षा ॥ १३ ॥ तव नामें

अजामिल गणिका । पावन केलें पशुपक्ष्यादिकां । प्रत्यक्ष मज भेटलासि द्वारका-। नाथा अभयप्रद ॥ १४ ॥ जळालें कलि-
कल्मष सबीज । देखिले श्रीगुरु राजाधिराज । नृसिंहस्वामीसमर्थ सहज । कृतार्थ आज जाहलों ॥ १५ ॥ समर्थ वदती
कुटिलद्विजासी । पश्चात्तापें शुद्ध झालासी । तरी उठवावें मृतधेनूसी । सत्यत्व सर्वांसी वाटेल ॥ १६ ॥ कुटिल
म्हणे मी शरण अनन्य । आपण करुणार्णव धन्य । श्रीसद्गुरुआज्ञा शिरसां मान्य । वचन प्रमाण होईल ॥ १७ ॥
मी सेवक दीन दुर्बल । आज्ञा प्रमाणचि केवल । नृसिंहचरणाचें तीर्थ निर्मल । विप्रें घेतलें सुपात्रीं ॥ १८ ॥
अकालमृत्युहरण । सर्वव्याधिविनाशन । शरीरशुद्धि धर्मसाधन । मोक्षदायक गुरुतीर्थ ॥ १९ ॥ गुरुदेवतीर्थ-
महिमा अपार । नेणती ब्रह्मादिक सुरवर । ऐसें बोलूनि मृतधेनूवर । विप्रें तीर्थ प्रोक्षिलें ॥ १२० ॥ सिंचन
करितां पादोदक । गुरुलीलें वर्तलें अलौकिक । दोन दिवसांची मृतधेनु देख । थरथरूनि उठली ते ॥ २१ ॥
जैसें निद्रा संपतां होय जागृति । तैसेंचि जाहलें धेनूप्रति । ईश्वरलीला गहन गति । अगम्य अतर्क्य सर्वत्र ॥ २२ ॥
ईश्वरेच्छा बलवान् वैभव । निमिषांत केली धेनु सजीव । तटस्थ पाहती लोक सर्व । महदाश्चर्य वर्तलें ॥ २३ ॥
अत्यंत पातकी द्विजकुटिल । त्याचेच हस्तें प्रोक्षवूनि तीर्थजल । दोन दिवसांचें मृतशव निर्बल । तात्काल उठविती
सद्गुरु ॥ २४ ॥ अनुचित कर्मिष्ठ महद्दोषी । क्षणांत केला द्विज निर्दोषी । परमात्माचि संन्यासवेषी । श्रीमत्परमहंस
प्रगटले ॥ २५ ॥ कृपामृतदृष्टीनें पाहतां । महारोग्यांसी आरोग्य झालें तत्त्वतां । अतिपापिष्ठासि उद्धरिलें,
आतां । मृतधेनूसी उठविलें ॥ २६ ॥ हेचि परब्रह्मपरात्पर । करावयासी जगदुद्धार । अवतरले नृसिंहयोगीश्वर ।
स्वेच्छाचारें वर्तती ॥ २७ ॥ अविद्याअज्ञानांधःकार–। युक्त प्रपंचिक नारीनर । पावन करावे यदर्थ महीवर ।
स्वच्छंदें यतिवर संचरती ॥ २८ ॥ अविद्याअज्ञान-वेष्टितांसी । दिसती गुरु मनुष्यविलासी । परी हे सर्वथैव

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

भ्रांतिष्टासी । कैसें कळे सत्यतत्त्व ॥ २९ ॥ मनुष्यासारिखे व्यवहार । स्थूलदृष्टीनें वरवर । काय जाणती जीवपामर । ईश्वरचरित्र अगाध ॥ १३० ॥ ओळखीवांचून सर्व वृथा । पुराण कीर्तन व्याख्यानकथा । पक्वानांचीं नामें घेतां सर्वथा । उदरतृप्ति नव्हेचि ॥ ३१ ॥ कुटिलद्विजाची परिवार । स्त्री कन्या भगिनी पुत्र । करिती साष्टांग नमस्कार । यतिनाथचरणीं सद्भावें ॥ ३२ ॥ म्हणती धन्य भाग्योदय । न सांपडे करितां अनेकसाधनोपाय । सुदुर्लभ ते सद्गुरुपाय । सहज निर्भय देखिले ॥ ३३ ॥ कामधेनु आली घरीं । अनायासें कल्पद्रुम द्वारीं । चिंतामणि आलिया करीं । मग काय उणें असे हो ॥ ३४ ॥ याहून फल अधिकाधिक । आळशावरी वर्षलें गंगोदक । श्रीगुरु अखिलब्रह्मांडनायक । देखतां हर्षित जाहलों ॥ ३५ ॥ सर्व पदार्थ मिथ्या नाशिवंत । आम्ही दरिद्री वित्तरहित । काय समर्पावें प्रभूसी अनंत । अखंड-अव्ययाकारणें ॥ ३६ ॥ लक्ष्मी ज्याचिया पायीं लोळे । पुष्प तरी चरणकमळें । चरणापासून गंगोदक निघालें । काय वहावें देवराया ॥ ३७ ॥ तथापि भक्तिप्रेमभरित । यथाशक्ति जें जें विहित । सानुकूल होऊनि शुद्धचित्त । करूं पूजन अत्यादरें ॥ ३८ ॥ यथाविधि पादप्रक्षालन । गंधाक्षतपुष्पादिकीं केलें पूजन । नैवेद्य फल तांबूल अल्पधन । वस्त्रालंकार समर्पिलें ॥ ३९ ॥ नीरांजन-कर्पूरारति । भक्त भावार्थे ओवाळिती । नामसंकीर्तनें यश गाती । जयजयकार करिती आनंदें ॥ १४० ॥ मंत्रपुष्पांजलि उच्चस्वरें । वेदघोष करिती आदरें । प्रदक्षिणा घालिती सारे । साष्टांग नमिती जगद्वंद्या ॥ ४१ ॥ त्या कुटिलब्राह्मणाचे सदनीं । परमानंद व्यापिला त्रिभुवनीं । एक प्रहर गेली रजनी । नृसिंहमुनीश्वरलीलेंत ॥ ४२ ॥ हरि प्रकट असे हरिद्वारीं । परब्रह्म नाचे भक्तकैवारी । पूर्व प्रश्नोत्तर नरहरि । स्वयें सांगती समस्तांतें ॥ ४३ ॥ श्रोतीं सावधान असावें । श्रीगुरुमुखसुवृत्त परिसावें । जेणें यथेप्सित सफल व्हावें । गुरुप्रसादें निःसंशय ॥ ४४ ॥ "आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण । आमचें नाम 'नृसिंहभान'।

****************************************

मूळपुरुष वटवृक्षस्थान । दत्तनगर-निवासी हो" ॥ ४५ ॥ हें ऐकूनि वदे एक द्विज । मंत्र म्हणा हो योगीराज ।
मग नृसिंहविश्वेश्वर सहज । पठण करूं लागले ॥ ४६ ॥ चतुर्वेद वेदांगसहित । सार्थ पठती यथास्थित । पाहिजे तें
मंत्रविधान विहित । सांगती शांत सकळांतें ॥ ४७ ॥ मनांतील विकल्प शंका– । निवृत्ति करिती तात्काल देखा ।
अद्भुत आश्चर्य समाधान लोकां । वाटलें सामर्थ्य अतुल ॥ ४८ ॥ अनन्यभावें धरिती चरण । म्हणती आलों आम्ही
शरण । अपराध क्षमा करा संपूर्ण । प्रत्यक्ष ब्रह्मसनातना ॥ ४९ ॥ अज्ञान-अहंकारें भरलों । अविद्यामायें मातलों ।
प्रत्यक्ष ईश्वर असूनि भुललों । मदांध झालों गुरुराजा ॥ १५० ॥ समर्थ वदती अमृतवचन । सुखरूप असा पुष्कळ दिन ।
स्ववर्णाश्रमधर्में वर्तन । ईश्वरोपासन करावें ॥ ५१ ॥ भूतदया मृदुभाषण । वंदावे देव साधु ब्राह्मण । सारासारविवेक
प्रमाण । हृदयस्थ जनार्दना ओळखावें ॥ ५२ ॥ यापरी आशीर्वचन देउनी । निघून गेले नृसिंहमुनि । मग लोक गेले
निजस्थानीं । अपार चरित्र वर्णिती ॥ ५३ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित ।
अष्टमाध्याय रसिक हा ॥ १५४ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे अष्टमोऽध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

